**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – पांडूरंग राजाराम चव्हाण

माझे वय – ६३ वर्षे,

व्यवसाय – शेती

रा. – देवूळवाडा, मालवण ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग

**<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.टी.ए.भणगे यांचे मार्फत.</u>**

०१. दि. २७/०३/२०२१ रोजी पोलीसांनी मला बोलविले नव्हते. माझ्या समक्ष कुठल्याही वस्तु जप्त केल्या नव्हत्या. मला आता जप्ती पंचनामे दाखविण्यात आले. त्यावर माझ्या सहया आहेत. मला जप्ती पंचनाम्यातील मजकूर काय लिहिलेला आहे हे माहिती नाही.

**<u>साक्षीदार हा त्याच्या पूर्व जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली त्यानुसार सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.</u>**

०२. हे खरे नाही की, दि. २७/०३/२०२१ रोजी पोलीसांनी मला मालवण पोलीस स्टेशन येथे बोलविले होते, त्याठिकाणी पोलीसांनी मला पंचनामा करावयाचा आहे असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष यामाहा कंपनीची फॅसीनो गाडी क्र. एमएच–०७–एएफ–३६०६ व टीव्हीएस कंपनीची ज्युपिटर मोटरसायकल क्र. एमएच–०७–एएन–११३५ जप्त करुन पंचनामा केला होता. मी आरोपींना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एच.आर.गरगटे यांचे मार्फत.</u>**

आरोपीच्या वकिलांनी उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

ठिकाण : मालवण
दिनांक : १८/०६/२०२४

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण